होमिओपॅथी महाविद्यालयाला मान्यता देण्याबाबत

श्री. धनेश्वरी मानव विकास मंडळ, औरंगाबाद संचलित एसएसव्हीपी होमिओपॅथी मेडीकल कॉलेज अँन्ड रिसर्च इन्स्टिटयुट, हट्टा, ता.वसमत, जि. हिंगोली

S.S.V.P. Homoeopathic College & R.I.
HATTA
Tq.Basmat
Dist.Hingoli

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक:एचएमसी-२०१६/प्र.क्र.१४/१६/शिक्षण-१,
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- २४ ऑक्टोबर, २०१८

वाचा :-
१) शासनाचे समक्रमांकाचे ना-हरकत प्रमाणपत्र दिनांक २८.०४.२०१६
२) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/युजी/पी-४/इएक्सटी/५१/२०१८, दि. ६.१.२०१८
३) आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.R.१२०१४/१४/२०१७-EP(H), दिनांक १५.१०.२०१८

**प्रस्तावना:-**

श्री. धनेश्वरी मानव विकास मंडळ, औरंगाबाद संचलित एसएसव्हीपी होमिओपॅथी मेडीकल कॉलेज अँन्ड रिसर्च इन्स्टिटयुट, हट्टा, ता.वसमत, जि. हिंगोली या होमिओपॅथी महाविद्यालयास संदर्भाधीन पत्र क्रमांक (१) अन्वये ६० विद्यार्थी क्षमतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (३) अन्वये ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी संस्थेच्या सदर महाविद्यालयास मान्यता दिलेली आहे. सदर बाब विचारात घेता, संस्थेच्या होमिओपॅथी महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी होमिआपॅथी महाविद्यालय सुरु करण्याकरिता शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

श्री. धनेश्वरी मानव विकास मंडळ, औरंगाबाद संचलित एसएसव्हीपी होमिओपॅथी मेडीकल कॉलेज अँन्ड रिसर्च इन्स्टिटयुट, हट्टा, ता.वसमत, जि. हिंगोली या होमिओपॅथी महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (३) अन्वये ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सदर होमिओपॅथी महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी ६० विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१. श्री. धनेश्वरी मानव विकास मंडळ, औरंगाबाद संचलित एसएसव्हीपी होमिओपॅथी मेडीकल कॉलेज अँन्ड रिसर्च इन्स्टिटयुट, हट्टा, ता.वसमत, जि. हिंगोली या होमिओपॅथी महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार ६० एवढी राहील.

२. राज्य शासन/ केंद्र शासन/ मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.



Scanned with CamScanner

३. शासकीय नियम/अधिनियम/शासन निर्णय तसेच मा.सर्वोच्च व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४. केंद्र शासन, केंद्रिय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी होमिओपॅथी अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र.VI १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. सदरहू संस्थेस कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७. शासकीय होमिओपॅथी किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करु नयेत.

९. केंद्र शासनाने दिलेली परवानगी ही सन २०१८-१९ वर्षाकरिता प्रवेशित होणारे विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षामध्ये दाखल होईपर्यंत असून संस्थेने त्यानुसार पुढील वर्षाचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

१०. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्यांना प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून मंजूर घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण अथवा तत्सम प्राधिकरण यांच्याकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भ क्र.(३) अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.श्री.पुं.कोतवाल)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.

D:\सन 2017.15 Homiyopathi CR 14-2016.docx

S.S.V.P.Homoeopathic College & R.I. HATTA Tq.Basmat Dist.Hingoli

Scanned with CamScanner

९. अध्यक्ष/सचिव, श्री. धनेश्वरी मानव विकास मंडळ,बी-१०१, तुलसी आर्केड कॅनॉट गार्डन, सिडको, ता.जि.औरंगाबाद-४३१००५.

१०. अधिष्ठाता, सर्व शासकीय आयुर्वेद महाविद्यालये.

११. अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ अनएडेड प्रायव्हेट ॲण्ड डेंटल कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री. जी. हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई.

१२. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/ शुल्क नियामक प्राधिकरण, २०५, गर्व्हमेंट पॉलीटेक्निक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू) मुंबई-५१.

१३. अवर सचिव, (शिक्षण २), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई

१४. निवडनस्ती (शिक्षण-१).

S.S.V.P. Homoeopathic College & R.I. HATTA Tq.Basmat Dist.Hingoli

PRINCIPAL
S.S.V.P. Homoeopathic
College & R.I. Hatta
Tq. Basmath Dist Hingoli

D:\जन 2017\15 Homiyopathi\CR 14-2016.docx

Scanned with CamScanner